जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:- sp.jalgaon@mahapolice.gov.in

# -:प्रेस नोट :-

दिनांक :- २०/०६/२०२६

## " गुजरातमधून चोरीस गेलेली ९,००,०००/- रुपये किंमतीची किया कंपनीची कार एम.आय.डी.सी. पोलिसांनी केली जप्त "

बोपल पोलीस स्टेशन, अहमदाबाद ग्रामीण (गुजरात) हद्दीत दिनांक १५/०४/२०२६ रोजी किया कंपनीची कॅरेन्स मोटार कार क्र. MP 04 ZL 5155 चोरीस गेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेली कार दिनांक १८/०६/२०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता नशिराबाद टोलनाका ओलांडून जळगावच्या दिशेने येत असल्याची माहिती भोपाल पोलीस स्टेशनकडून एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जळगाव यांना गोपनिय माहिती प्राप्त झाली होती.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनमधील वाहतूक शाखेचे अंमलदार पोहेकॉ/१८३७ संदीप सपकाळे, पोकॉ/६०६ रमेश अहिरे व पोकॉ/२१९३ अफजल बागवान हे दिनांक १८/०६/२०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.१५ वाजता काशीनाथ चौक येथे नाकाबंदी करीत असताना त्यांना सदर वाहन येताना दिसले. **अंमलदारांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने वाहन न थांबविता भरधाव वेगाने काशीनाथ चौकातून अजिंठा चौफुलीकडे नेले. त्यानंतर पोकॉ/६०६ रमेश अहिरे व पोकॉ/२१९३ अफजल बागवान यांनी तत्परतेने वाहनाचा पाठलाग करून अजिंठा चौफुली परिसरातील हिरो होंडा शोरूमसमोर वाहन अडविले.** वाहन चालकाची चौकशी केली असता सदर वाहन हे वरील चोरीच्या गुन्ह्यातील असल्याची खात्री झाली. त्यानंतर वाहन व चालकास ताब्यात घेऊन एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले. सदर बाबत भोपाल पोलीस स्टेशन, अहमदाबाद ग्रामीण (गुजरात) यांना माहिती देण्यात आली. त्यानुसार दिनांक १९/०६/२०२६ रोजी भोपाल पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे हजर असनु ताब्यात घेण्यात आलेली सुमारे **९,००,०००/- रुपये किंमतीची किया कॅरेन्स मोटार कार क्र. MP 04 ZL 5155 तसेच वाहन चालक यांना नियमानुसार बोपल पोलीस स्टेशनच्या अंमलदार यांचे ताब्यात देण्यात आले.**

**सदरची कार्यवाही कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक जळगाव परिमंडळ, श्री. नितीन गणापुरे उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव विभाग, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड नेतृत्वाखाली पोहेकॉ/१८३७ संदीप सपकाळे, पोकॉ/६०६ रमेश अहिरे व पोकॉ/२१९३ अफजल बागवान या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव

*************************************************************************************


MP04ZL5155